महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र राज्य बिगर कृषि सहकारी पतसंस्था

नियामक मंडळ, पुणे यांचे कार्यालय,नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

ई-मेलआयडी-regulatoryboard2019@gmail.com दुरध्वनी क्रमांक-०२०- २६१२२८४६/४७

जा.क्र.पतसंस्था/सआ-५/नियामक मंडळ/लेप.वर्ग./सन २०२० दिनांक :- ९ /१०/२०२०

**परिपत्रक**

**विषय :- कोविड-१९ च्या अनुषंगाने उद्भवलेल्या परिस्थितीमुळे, सन २०२०- २१ या आर्थिक वर्षाकरिता सहकारी पतसंस्थांच्या वैधानिक लेखापरिक्षण वर्गवारीबाबत निर्धारीत केलेले निकष शिथिल करणेबाबत.**

**संदर्भ** :- १. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील दि.२९/०४/२०१० रोजीचे परिपत्रक.

२. महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळ, पुणे यांच्या दि.२४/०९/२०२० रोजीच्या समिती सभेतील निर्णय.

२/- संदर्भ क्र. १ चे परिपत्रकान्वये, राज्यातील नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांसाठी ६०० गुणांचे व पगारदार कर्मचारी पतसंस्थांसाठी २०० गुणांचे लेखापरीक्षण वर्गवारी निकष निर्धारीत केलेले असून सदरचे निकष हे या संस्थांसाठी सन २०१०- २०११ या वर्षापासून लागू करण्यात आलेले आहेत.

नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थासाठी भांडवल पर्याप्तता, जिंदगीची गुणवत्ता, व्यवस्थापन, उत्पन्न (नफा), तरलता, कार्यपध्दती व नियंत्रण या सहा घटकांना मिळालेल्या गुणांचे वेटेड ॲव्हरेज (Weighted Average) च्या आधारे लेखापरीक्षण वर्गवारी ठरविण्यात आलेली आहे व पगारदार कर्मचारी पतसंस्थाकरिता याच घटकांचे आधारे प्राप्त होणा-या गुणांकनानुसार लेखापरीक्षण वर्गवारी निकष निर्धारित करण्यात आलेले आहेत.

उपरोक्त संदर्भ क्र.२ नुसार, कोविड-१९ च्या उद्भवलेल्या परिस्थितीमुळे सहकारी पतसंस्थांच्या आर्थिक स्थितीवर, कर्ज वसुलीवर व एकंदरीत वरील नमूद सहा घटकांवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे विपरित परिणाम झाल्याने व होत असल्याने, सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षाकरिता वैधानिक लेखापरीक्षण वर्गवारीच्या निकषांमध्ये नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांकरिता वेटेड ॲव्हरेज (Weighted Average) काढल्यानंतर मिळणारे गुण दहा प्रमाणे कमी व पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्थांकरिता १०% प्रमाणे वर्गवारीची पायरी कमी करण्याबाबत नियामक मंडळाच्या सभेत निर्णय घेण्यात आलेला आहे.

उपरोक्त बाब विचारात घेता, नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था व पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्थाकरिता केवळ सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षासाठी खालीलप्रमाणे वैधानिक लेखापरीक्षण वर्गवारी सुधारित गुणाकंन निकष निर्धारीत करण्यात येत आहेत.

**नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था वैधानिक लेखापरीक्षण वर्गवारीचे सुधारित गुणांकन निकष :-**

| अ.क्र. | वेटेड ॲव्हरेज (Weighted Average ) | लेखापरिक्षण वर्ग |
|---|---|---|
| १ | ६५ व त्याचेवर गुण असल्यास | अ |
| २ | ५१ ते ६४ पर्यंत गुण असल्यास | ब |

| | | |
|---|---|---|
| ३ | ४१ ते ५० पर्यंत गुण असल्यास | क |
| ४ | ४० पर्यंत गुण असल्यास | ड |

**पगारदार कर्मचारी पतसंस्थासाठी वैधानिक लेखापरीक्षण वर्गवारीचे सुधारित गुणांकन निकष**

| अ.क्र. | मिळालेले मार्कस (टक्केवारी) | लेखापरिक्षण वर्ग |
|---|---|---|
| १ | ६५ % व त्याचेवर गुण असल्यास | अ |
| २ | ५१ % ते ६४ % पर्यंत गुण असल्यास | ब |
| ३ | ४१% ते ५०% पर्यंत गुण असल्यास | क |
| ४ | ४०% पर्यंत गुण असल्यास | ड |

या व्यतिरिक्त अन्य कोणताही बदल संदर्भ क्र.१ च्या परिपत्रकातील निकषामध्ये करण्यात आलेला नाही.

राज्यातील सहकारी पतसंस्थांकरिता वरीलप्रमाणे वैधानिक लेखापरीक्षण वर्गवारी सुधारीत गुणांकन निकष हे केवळ सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरिताच लागू राहतील.

( अनिल कवडे )
**अध्यक्ष, नियामक मंडळ**
**तथा सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे**

प्रति-

१. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
२. जिल्हा विशेष लेखापरीक्षक सहकारी संस्था (सर्व)
३. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (प्रशासन / लेखापरीक्षण) (सर्व)
४. अध्यक्ष, नागरी / ग्रामीण / कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., (सर्व).
५. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या., मुंबई
सीटीसी क्र.११९/बी, तिसरा मजला, प्रमिला अपार्टमेंट, लकाकी बंगलोशेजारी, लकाकी रोड, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे-४११ ०१६.
६. अध्यक्ष, नागरी / ग्रामीण / कर्मचारी सहकारी पतसंस्थांचे फेडरेशन (सर्व).

प्रत माहीतीसाठी-

१. अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. अपर निबंधक सहकारी संस्था (प्रशासन / लेखापरीक्षण) (सर्व) मुख्यालय, पुणे.
३. मा.प्रधान सचिव (सहकार) , सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई-३२ (सविनय सादर).